# प्रचुरता

## ‘आनंदमय जन्मदिवस’ याप्रीत्यर्थ
## गुरुमाई चिद्विलासानंद यांनी निवडलेला एक सद्‌गुण

### सिद्धयोग ध्यानशिक्षक याऊ मिलर यांच्याद्वारे लिखित भाष्य

प्रचुरता हा सद्‌गुण स्मरण करवून देतो, पृथ्वीच्या विपुलतेचे—पर्जन्याचा आणि सूर्याचा उपहार, आपल्या ग्रहावरील बहुसंख्य वनस्पतींचा तसेच प्राणिजीवनाचा उपहार आणि त्या सर्व अब्जावधी नक्षत्रांचा व आकाशगंगांचा उपहार, ज्या रात्रीच्या आकाशाला प्रकाशाने उजळून टाकतात.

‘श्रीसूक्तम्’ या ऋग्वेदातील एका स्तोत्रामध्ये या व्यापक दिव्य शक्तीची स्तुती केली गेली आहे. यातील एका सूक्तात म्हटले आहे :

चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीं श्रियं लोके देवजुष्टामुदाराम्
तां पद्मनेमीम शरणमहं प्रपद्येऽलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे ॥ ५ ॥

मी ‘श्री’ला शरण जातो,
जी जगतात प्रचुरतेच्या रूपात प्रकट आहे.
मी तिला शरण जातो जी कमलपुष्पांनी सुशोभित आहे,
ती, जी चंद्राच्या सुंदर प्रभेच्या रूपात प्रकट आहे,
ती, जिचे स्तुतिगान सर्व देवतागण करतात.
हे ‘श्री’, दुर्भाग्य दूर कर! [१]

‘श्री’च्या आपल्या आराधनेत वैदिक ऋषिंनी विश्वातील प्रचुरतेच्या स्रोताला जाणले आणि त्याचा सन्मान केला.

प्रचुरतेसाठी असलेला ‘अबन्डन्स्’ हा इंग्रजी शब्द, लॅटिन भाषेतील ‘ॲबन्डेन्शिया’ या शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ आहे, परिपूर्णता आणि समृद्धी किंवा बाहुल्य. संस्कृतमध्ये, प्रचुरतेला ‘श्री’ या शब्दाने दर्शवले जाते जो पवित्रता, सौंदर्य, कृपा आणि मांगल्य यांचा सूचक आहे. ‘श्री’ हे महालक्ष्मीचे एक नावही आहे, जी प्रचुरतेची देवी आहे आणि त्या दिव्य शक्तीचे एक रूपही आहे जी विश्वाचे सृजन करते आणि जिने विश्वाला व्यापले आहे.

*Enthusiasm* [एन्थ्यूझीॲझम्] या आपल्या पुस्तकामध्ये श्रीगुरुमाई म्हणतात :

> जेव्हा तुम्ही स्वतःच्या संपूर्ण अस्तित्वाला, त्याच्याच सूक्ष्म स्पंदनामध्ये स्थिर होऊ देता, तेव्हा तुम्ही परमेश्वराची शक्ती अनुभवू शकता. ती 'श्री' आहे. ती मांगल्य, सौंदर्य, पावित्र्य, प्राचुर्य, उदात्तता, शालीनता आणि सद्भाग्य यांनी परिपूर्ण आहे. हे जाणा, की हे सर्वकाही तुमच्या अंतरी विद्यमान आहे.[२]

'श्री'शी निगडित असलेले प्रचुरतेचे गुण आपल्या स्वतःच्या अस्तित्वात विद्यमान आहेत; खरोखर, आपण स्वतःच्याच हृदयात ब्रह्मांडाच्या व्यापकतेची अनुभूती करू शकतो. जसजसे आपण या अनुभवाशी वारंवार अनुसंधान साधत राहतो आणि स्वतःला या गोष्टीचे स्मरण करवून देतो की, 'श्री' आपला अंगभूत स्वभावच आहे, तसतसा आपल्या जीवनात प्रचुरतेचा स्थायी बोध अधिकाधिक विकसित होत जातो.

प्रचुरतेचा विकास करण्याची एक पद्धत जी मला विशेषत्वाने प्रभावी वाटते, ती म्हणजे माझ्या जीवनात मला जे आशीर्वाद प्राप्त झाले आहेत त्यांची जाण ठेवणे, त्यांची अभिस्वीकृती करणे, जसे : जीवन रूपांतरित करणारा उपहार—शक्तिपात दीक्षा, सिद्धयोग गुरूंचे मार्गदर्शन, माझे कुटुंब आणि मित्रगण, चांगले स्वास्थ्य आणि निसर्ग-विश्वाचे सौंदर्य ज्याने मला आणि प्रत्येकाला वेढून टाकले आहे.

आपली आध्यात्मिक आत्मकथा, 'चित्शक्ती विलास' यामध्ये बाबा मुक्तानंद दिव्य आत्म्याच्या प्रचुरतेचे वर्णन करतात :

> काय ग्रहण करण्यासाठी पळतो आहेस? संसारात तुझ्याहून अन्य काही नाही. विश्वभर तूच व्याप्त आहेस, तूच सिद्ध, अक्षय तत्त्व आहेस. तुझ्यात आणि जगात भेद नाही. कोणतेही द्वैत नाही. तूच अद्वैतरूपाने सर्व विश्वात भरून राहिला आहेस. तूच प्रशांत, अव्यय, निर्मल, चित्प्रकाश कुंडलिनी आहेस.[३]

असंख्य रूपांनी व आकारांनी सजलेली जगताची प्रचुरता चितीच्या प्रकाशाला प्रतिबिंबित करते, जी प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात विद्यमान आहे. विश्वाच्या अपरिमित प्रचुरतेला खऱ्या अर्थाने ग्रहण करण्यासाठी आपल्याला अंतरी वळावेच लागेल.

> मी 'श्री'ला शरण जातो,
> जी जगतात प्रचुरतेच्या रूपात प्रकट आहे.[४]

## प्रचुरतेसाठी अभिकथन

मी ‘श्री’ला शरण जातो, जी जगतात प्रचुरतेच्या रूपात प्रकट आहे.

*[अभिकथन—ते कथन ज्याचे जागरूकतेसह वारंवार उच्चारण केले जाते, जेणेकरून ते आपल्या चेतनेत स्थिरावेल.]*

---

[१] श्रीसूक्तम्, ५; कॉन्स्टन्टिना रोड्झ् यांच्याद्वारे लिखित *Invoking Lakshmi, The Goddess of Wealth in Song and Ceremony* [ऑल्बनी : स्टेट यूनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्क प्रेस, २०१०], पृ १२१-१२२.

[२] गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक, *Enthusiasm* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस. वाय. डी. ए. फाउंडेशन, १९९७] पृ १२.

[३] स्वामी मुक्तानंद, चित्शक्ती विलास [चित्शक्ति पब्लिकेशन्स, २०१३] पृ २१९.

[४] श्रीसूक्तम्, ५; कॉन्स्टन्टिना रोड्झ् यांच्याद्वारे लिखित *Invoking Lakshmi, The Goddess of Wealth in Song and Ceremony* [ऑल्बनी, न्यूयॉर्क : SUNY प्रेस, २०१०] पृ १२१.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.